# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
### बुधवार, दिनांक १० डिसेंबर, २०२५
**(दुपारी १२.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे**

(क) तारांकित प्रश्न

**(ख) तारांकित प्रश्नांची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

| | | |
|---|---|---|
| **मुख्यमंत्री** | : (१) | **"शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची कंत्राटी पध्दतीने पुनर्नियुक्त्या होत असल्याबाबत"** या विषयावरील प्रा. जोगेन्द्र कवाडे व इतर वि.प.स यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक १२०४ ला दिनांक ११ मार्च, २०२० रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील. |
| **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** | : (२) | **"इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत"** या विषयावरील श्री. रमेश कराड व इतर वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक १९७२८ ला दिनांक २८ जुलै, २०२३ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील. |

**(ग) अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली ते दहावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

| | | |
|---|---|---|
| (१) | **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** : | "गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |
| (२) | **वैद्यकीय शिक्षण मंत्री** | "महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षांचे लेखे अहवाल व सन २०२२ या वर्षाचा चोवीसावा व सन २०२३ या वर्षाचा पंचवीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |

(३) **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** : "विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन २०२०-२०२१, सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ करिता सुधारित अलग लेखा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(४) **अन्न व औषध प्रशासन मंत्री** "हाफकिन जीव - औषध निर्माण महामंडळ मर्यादित यांचा सन २०१८-२०१९ ते सन २०२०-२०२१ या वर्षांचा अनुक्रमे पंचेचाळीसावा, सेहेचाळीसावा व सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(५) **सामाजिक न्याय मंत्री**

(क) "लोकशाहिर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०१०-२०११ व सन २०११-२०१२ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(ख) "महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक लेखे अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(ग) "संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०१९-२०२०, सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षांचे अनुक्रमे सेहेचाळीसावा, सत्तेचाळीसावा व अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **श्री.अमित गोरखे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत"स्थापत्य कन्सल्टंट इंडिया प्रा.लि." या खाजगी ठेकेदाराकडून शहरातील सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण करण्यात आले, या सर्वेक्षणात तब्बल ३,७०,२१३ मिळकतींना कर आकारणी झालेली नसणे, संबंधित ठेकेदाराकडून हजारो मिळकतींना चुकीचे नंबरिंग देणे, अनेक अनधिकृत मालमत्तांची एकत्रित नोंदणी न करता फोड करून स्वतंत्र फाईल्स तयार करण्यात आल्या असणे, चुकीच्या नोंदींमुळे मालमत्ता विभागण्या, जादा आकारणी, चुकीचे बिल वाटप, जप्ती नोटिसांवरील चुकीचे पत्ते इत्यादी गंभीर प्रकार घडणे, एसआर-वन फाईल्स संदर्भात, सुमारे ५,१५० प्रकरणे गट प्रमुखांकडे प्रलंबित असणे, सर्वेक्षण कामासाठी प्रारंभी ४७ कोटी ९५ लाख रुपये मंजूर

करण्यात आले असताना, “ड्रोन सर्वेक्षण” या नावाखाली वाढीव २९ कोटी रुपये ठेकेदाराला देण्यात आले असणे, निविदेतील अटींचा विपर्यास करून व खोटे दाखले देऊन ठेकेदाराला जादा लाभ देण्यात आल्याचा गंभीर संशय असणे, प्रत्यक्षात हे ड्रोन सर्वेक्षण हा निव्वळ बोगस बिलाद्वारे लूट करण्याचा डाव असल्याचे स्पष्ट दिसून येणे, नागरिकांना कल्पना न देता त्यांच्या मालमत्तेची कर आकारणी करण्यात आली असणे, अनेक नागरिकांना एसआर-वन नोटीसदेखील दिली गेलेली नसल्याने नागरिकांच्या हक्कांवर गदा आणली असणे, या प्रकरणाची तातडीने सखोल चौकशी करण्यात येणे, स्थापत्य कन्सल्टंट ठेकेदाराने केलेल्या सर्वेक्षणाचे त्रयस्थ ऑडिटरमार्फत स्वतंत्र लेखापरीक्षण (Audit) करण्यात येणे, बेकायदेशीर नियुक्त्या व कामगारांच्या पिळवणुकीबाबत स्वतंत्र समिती नेमून चौकशी करण्यात यावी व दोषींवर कडक कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर येथील सह-दुय्यम निबंधक यांनी इंदिरानगर भागातील सर्व्हे क्र. १०६ येथील ५०० नागरिकांच्या कन्फर्मेशन डीड नोंदणीसंबंधी परिपूर्ण कागदपत्रे व मुद्रांक शुल्क जमा असताना नोंदणी प्रक्रियेला जाणीवपूर्वक अडथळा आणणे, नागरिकांना दिवसभर वेठीस धरणे, कार्यालयीन वेळेत अचानक कार्यालय सोडून जाणे, कारण न सांगता अनुपस्थित राहणे, नंतर पुन्हा नोंदणीची वेळ वाढवून घेतल्यानंतरही प्रत्यक्ष नोंदणी सुरू होताच एका दूरध्वनीनंतर मनमानीपणे संपूर्ण कर्मचारीवर्गासह कार्यालयाला कुलूप लावून परिपूर्ण कागदपत्रांसह आलेल्या नागरिकांची अडवणूक करणे, ही घटना गंभीर शासकीय नियमभंग, बेजबाबदार वर्तन, मनमानी आणि सार्वजनिक सेवेचा उघड गैरवापर ठरत असणे, परिणामी नागरिकांचा वेळ, श्रम आणि शासकीय यंत्रणेचे संसाधन यांचा उघड अपव्यय होऊन शासनाबद्दल अविश्वास निर्माण होत असणे, बाह्य राजकीय दबावामुळे दस्त नोंदणी थांबविणे ही कायद्याची पायमल्ली ठरणे, तसेच महसूल विभागाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण करणे, म्हणून संबंधित सह-दुय्यम निबंधकावर तातडीची कठोर शिस्तभंगात्मक कारवाई करून निलंबन करणे अत्यावश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्री.किशोर दराडे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नंदुरबार जिल्हा माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना पुणे येथे उपसंचालक म्हणून कार्यरत असताना दिनांक ११ फेब्रुवारी, २०२० रोजी एसीबीने अटक केलेली असणे, सदर प्रकरणात त्यांच्यावर शासकीय बनावट कागदपत्र तयार करून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल असणे, दिनांक ४ जुलै, २०२४ रोजी पत्नी व त्यांच्यावर बेहिशोबी मालमत्ता असल्या प्रकरणी बंड गार्डन पोलीस स्टेशन, पुणे येथे

गुन्ह्याची नोंद झालेली असणे, तसेच धुळे जिल्हा येथे कार्यरत असताना अनेक बनावट कागदपत्र तयार करून शासनाचे करोडो रुपयाचे नुकसान केलेले असणे, तसेच धुळे येथून कार्यमुक्त होऊन सुद्धा शिक्षकांची बनावट कागदपत्रे तयार करून वैयक्तिक मान्यता प्रदान केलेले असणे, तसेच शासनातर्फे आदिवासी बहुल जिल्ह्यात कार्यरत कर्मचारी यांना एकस्तर वेतनश्रेणी दिली जाते सदर प्रकरणी शिक्षणाधिकारी यांनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी प्रकरण निकाली न काढणे, सदर शिक्षणाधिकारी यांनी केलेले घोटाळे व शासनाची केलेल्या फसवणूक विषयी वृत्तपत्रात बातम्या प्रसिद्ध होत असणे, नंदुरबार जिल्ह्यातील वाढीव टप्पा अनुदान मंजूर करणे कमी व अनुदान पत्र देणे कामी शिक्षक कर्मचारी यांची आर्थिक लूट केलेली असणे, अनेक संघटना व लोकप्रतिनिधी यांनी त्यांच्याविषयी शासनाकडे तक्रारी दाखल केलेले असणे, अशा शिक्षणाधिकारी यांचे निलंबन करून सेवेतून बडतर्फ करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **सर्वश्री अभिजित वंजारी, सुधाकर अडबाले, अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील ओ.बी.सी. ची संख्या ५० टक्केपेक्षा अधिक असूनही अद्यापही देशात अथवा राज्यात जातनिहाय जनगणना झाल्यामुळे प्रत्यक्षात ओ.बी.सी. ना सर्व प्रकारच्या शासकीय योजनांमध्ये न्याय न मिळाल्यामुळे राज्यातील मागास प्रवर्गातील जनतेमध्ये रोष निर्माण होणे, अनेक मागण्या शासनस्तरावर सोडविण्याची गरज असून ओ.बी.सी. प्रवर्गातील मुला-मुलींना परदेशात शिक्षणासाठी देण्यात येणारी शिष्यवृत्ती ७५ विद्यार्थ्यांवरुन ही संख्या २०० विद्यार्थी संख्या करण्यात येणे, म्हाडा व सिडकोतर्फे बांधून देण्यात येणारे घरकुल योजनेत ओ.बी.सी. करिता आरक्षण लागू करण्यात यावे, नागपूर येथे तयार असलेले उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे २०० मुलींचे वसतीगृह व स्व. वसंतराव नाईक जन्मशताब्दी वर्षानिमित्त तयार असलेले २०० मुलांचे वसतीगृह ओ.बी.सी. व्हीजेएनटी, एसबीसी. च्या विद्यार्थ्यांकरिता ओ.बी.सी. बहूजन कल्याण विभागाकडे हस्तांतरीत करणे, ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी करिता आर्थिक विकास महामंडळामार्फत असलेली थेट कर्जाची मर्यादा १ लाख व १५ लाख रूपये तसेच गहाण खतामध्ये फक्त शेतीची अट असून ती शिथील करण्यात यावी प्रत्येक शहर व तालुका स्तरावर ओ.बी.सी., व्हीजेएनटी, एस.बी.सी. च्या विद्यार्थ्यांकरिता सुसज्य ग्रंथालय व ई-लायब्ररी सुरू करण्यात यावी, डॉ. पंजाबराव देशमुख ओ.बी.सी. समाजसेवा पुरस्कार जाहीर करण्यात यावी, महाज्योती संस्थेकरीता व ओ.बी.सी. आर्थिक विकास महामंडळासाठी रुपये १ हजार कोटीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्री.अरुण लाड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील जिल्हापरिषद शाळांमध्ये एकूण २६५० शिक्षक कार्यरत असून, त्यापैकी केवळ ६५० महिला शिक्षिका असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आलेले असणे, महिलांच्या आरक्षण धोरण व गुणवत्तेनुसार महिला शिक्षिका कार्यरत असणे, ऑनलाईन बदली प्रक्रिया, महिलांना मिळणारा संवर्गचा लाभ यामुळे काही शाळांत उपलब्धता होत नसणे, त्यामुळे काही शाळा महिला शिक्षकांविनाच सुरू असल्यामुळे मुलींची मोठी गैरसोय होत असणे, महिला शिक्षकांचे प्रमाण २४.५ टक्के इतकेच असणे, हे प्रमाण अल्प असून १०० शाळांपैकी १२ शाळांमध्ये कोणतीही महिला शिक्षक नाही असे शाळा तपासणीत आढळून येणे, जिल्हा परिषदेच्या व शासकीय शाळांमध्ये मुलींना सुरक्षित आणि आदरयुक्त शिक्षण मिळावे, यासाठी महिला शिक्षकांची उपस्थिती अत्यावश्यक असते, मात्र प्रत्यक्ष परिस्थिती भयावह असणे, बदली धोरण व पदस्थापना देताना सुधारित निकष व शाळानिहाय आवश्यक विशिष्ट टक्केवारीनुसार प्रक्रिया राबवून धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, मुलींना त्यांच्या व्यक्तिगत समस्या किंवा आरोग्यविषयक अडचणी व्यक्त करण्यासाठी कोणत्याही विश्वासार्ह व्यक्तीचा / समुपदेशकाचा आधार नसणे, तसेच मुलींना सुरक्षित वातावरणासाठी शाळेमध्ये महिला शिक्षकांची आवश्यकता, मुलींना सुरक्षित शिक्षण व योग्य मार्गदर्शन मिळण्यासाठी महिला शिक्षकांची संख्या वाढविणे अनिवार्य असून शासनाने याप्रकरणी ठोस पावले उचलण्याची आवश्यकता, त्यामुळे शासनाने जिल्हा परिषद शाळांवर महिला शिक्षकांची नेमणूक करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्री.विक्रम काळे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात सामाजिक न्याय विभागाच्या वतीने राज्य शासनाने २८८ केंद्रिय अनुसुचित जाती आश्रमशाळांना मान्यता देण्यात येणे, तद्नंतर त्या योजनेचे शाहू, फुले, आंबेडकर अनुसूचित जाती आश्रमशाळा असे नामकरण करणे, या शाळांमध्ये राज्यात हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असणे, या शाळेतील शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी सातत्याने अनुदानाची मागणी होत असणे, या शाळांची सामाजिक न्याय विभागाकडून वारंवार तपासणी करण्यात येणे, या शाळांना अनुदान देण्यात येईल, असे शासनाने विधिमंडळात आश्वासित करणे, तत्कालीन सरकारने सन २०२० मध्ये या शाळेतील शिक्षक-कर्मचाऱ्यांना २०% वेतन अनुदान देण्यासाठी निर्णय करणे, या वेतन अनुदानासाठी आर्थिक तरतूद करणे परंतु हे वेतन अनुदान वेतनश्रेणीऐवजी मानधन स्वरुपात द्यावे यासाठीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असणे, परंतु, सामाजिक न्याय विभाग व विजभज तसेच आदिवासी विभागाच्या अधिपत्याखाली राज्यात हजारो अनुदानित आश्रमशाळा सुरु असणे, त्या शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना शाळा

संहितेप्रमाणे वेतनश्रेणीत अनुदान मंजूर असणे, त्याच आश्रमशाळांची शाळा संहिता या केंद्रिय आश्रमशाळेतील शिक्षक-कर्मचाऱ्यांना लागू असणे, सामाजिक न्याय मंत्री यांनी आपल्या दालनात दि.१३ मे २०२५ रोजी या विषयासंदर्भात मराठवाडा शिक्षक लोकप्रतिनिधी व संबंधित शिक्षक संघटनांची बैठक घेणे, शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ च्या पटसंख्येनुसार यू-डाएस प्रणालीवरील विद्यार्थी संख्येच्या माहितीनुसार अनुदान देण्याचा निर्णय शासन घेईल असे आश्वासित करणे, परंतु तरीही याबाबत शासनाकडून कोणताही ठोस निर्णय न होणे, त्यामुळे शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(७) **सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नियोजित पुण्यश्लोक विविध कार्यकारी सहकारी विकास सेवा संस्था मर्यादित, चोंडी, ता.जामखेड, जि.अहिल्यानगर या संस्थेस सहकार आयुक्त व निबंधक, सहकार संस्था, पुणे यांनी दिनांक १९ मार्च, २०२४ रोजी मान्यता दिलेली असणे, त्यानुषंगाने सहायक निबंधक, सहकार संस्था, जामखेड यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकार बँक मर्या., अहिल्यानगरच्या अरणगाव ता.जामखेड येथील शाखेत खाते उघडण्यास परवानगी दिलेली असणे, त्यानुसार संस्थेने जिल्हा मध्यवर्ती सहकार बँकेच्या उपरोक्त नमूद शाखेत खाते उघडण्यास व कर्ज पुरवठा करण्याबाबत दिनांक ३ मे, २०२४ च्या पत्राद्वारे विनंती केली असता बँक व्यवस्थापनाने संस्थेची उपरोक्त विनंती नाकरल्याची बाब निदर्शनास येणे, याबाबत संस्थेने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था नाशिक यांचेकडे तक्रार केली असता संस्थेचे खाते तातडीने उघडून देण्यासह संस्थेस आवश्यक तो कर्ज पुरवठा करण्याबाबत तसेच संस्थेच्या तक्रार अर्जात नमूद मुद्दयांबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतूदी व शासन परिपत्रकांचे पालन करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या असणे, तरीदेखील अद्यापपर्यंत संस्थेचे, जिल्हा मध्यवर्ती सहकार बँक अहिल्यानगर ता.जामखेड शाखा अरणगाव येथे खाते उघडलेले नसणे, संस्थेचे बँक खाते उघडण्यास दिरंगाई करणारे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याची तसेच संस्थेस खाते तातडीने उघडून आवश्यक तो कर्ज पुरवठा करण्याची आवश्यकता, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

**सहा : उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांचा प्रस्ताव :-**

"महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम २८९ अन्वये पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या संदर्भात, विधानपरिषद नियमातील नियम २३० (२) मधील तीन दिवसांच्या कालावधीची जी तरतूद आहे ती स्थगित करण्यात यावी"

**सात : सन २०२५-२०२६ च्या पुरवणी मागण्या ंवर चर्चा (पहिला दिवस)**
**खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल.**

**१)** मुख्यमंत्री

**२)** महसूल मंत्री

**३)** अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री

**४)** जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री

**५)** वैद्यकीय शिक्षण मंत्री

**६)** जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री

**७)** पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री

**८)** इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा मंत्री

**९)** आदिवासी विकास मंत्री

**१०)** माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री

**११)** कृषी मंत्री

**१२)** महिला व बालविकास मंत्री

**१३)** सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री

**१४)** ग्रामविकास व पंचायत राज मंत्री

**१५)** परिवहन मंत्री

**१६)** रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री

**१७)** मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री

**आठ : शासकीय विधेयके —**

**(क) विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

"सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १५ —महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अभिजित वंजारी, जयंत आसगावकर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १५ –महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

(१) "सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९२ – महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री एकनाथराव खडसे, सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अभिजित वंजारी, जयंत आसगावकर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९२ – महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(२) "सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९४ – महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री एकनाथराव खडसे, सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अभिजित वंजारी, जयंत आसगावकर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९४ – महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधानसभेने संमत केल्यास - विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

(१) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९५ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५.

(२) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९६ - महाराष्ट्र जन विश्वास (तरतुदींची सुधारणा) विधेयक, २०२५.

(३) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९७ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५.

(४) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९८ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२५.

(५) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९९ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५.

(६) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९३ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५.

**नऊ : (मंगळवार, दिनांक ०९ डिसेंबर, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** विक्रम काळे, प्रसाद लाड, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री अमोल मिटकरी, सदाशिव खोत, श्रीमती भावना गवळी, श्री.संजय खोडके, डॉ.परिणय फुके, सर्वश्री कृपाल तुमाने, इद्रिस नायकवडी, श्रीकांत भारतीय, किशोर दराडे, शिवाजीराव गर्जे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री किरण सरनाईक, दादाराव केचे, संदीप जोशी, संजय केणेकर, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री वसंत खंडेलवाल, अमरिशभाई पटेल, रणजितसिंह मोहिते-पाटील, योगेश टिळेकर, विक्रांत पाटील, अमित गोरखे, धर्मगुरू राठोड, वि.प.स. यांचा **म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यातील २९ जिल्हे, २५३ तालुके आणि २०५९ मंडळे यामध्ये अवकाळी पावसामुळे व अतिवृष्टीमुळे नद्या व नाल्यांना आलेले पूर, विदर्भ-मराठवाडयातील शेतक-यांचे उभे पीक वाहून गेल्याने शेतकरी बांधव अभूतपूर्व संकटात सापडले असणे, शेती हा केवळ उपजीविकेचा मार्ग नाही तर अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने नैसर्गिक आपत्तीत शासन शेतक-यांच्या पाठीशी ठामपणे उभे असणे, शाश्वत शेती समृध्द शेतकरी हे लक्ष्य समोर ठेऊन व सर्व निकष बाजूला ठेवून नुकसानग्रस्त शेतक-यांना शासनाकडून सर्वकष मदत तात्काळ देण्यात येणे, नुकसानाबाबत मोबाईल व ड्रोनद्वारे काढण्यात आलेले फोटो स्विकारण्याचा महत्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला असणे, युती शासनाने तब्बल ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे ऐतिहासिक मदत पॅकेज जाहिर करुन शेतक-यांना तात्काळ दिलासा देण्यात येणे, जमिन खरडून गेलेल्या शेतक-यांना ४७ हजार रुपये प्रतीहेक्टर रोख तसेच नरेगा योजनेच्या माध्यमातून ३ लाख रुपये प्रती हेक्टर अतिरिक्त मदत देण्यात येणे, गाडलेल्या विहिरींसाठी ३० हजार रुपये भरपाई देण्यात येणे, पडझड झालेल्या घरांच्या जागी नवीन घरे बांधण्याकरिता प्रधानमंत्री आवास योजनेतून १०० टक्के मदत देण्यात येणे, दुधाळ जनावारांकरिता जवळपास ३७ हजार ५०० रुपयांपर्यंत प्रति जनावर मदत देण्यात येणे, एनडीआरएफमध्ये असलेली ३ जनावरांपर्यंतची मर्यादा शिथिल करण्यात येणे, ओढकाम करणा-या जनावरांकरिता ३२ हजार रुपये प्रति जनावर देण्यात येणे, संबंधित भागातील विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क माफ करण्यात येणे, वीज बिलाची वसूल थांबविण्यात येणे, राज्यातील २ हजार ५९ मंडळांमध्ये क्रॉप डॅमेज झालेला निदर्शनास आल्याने त्याठिकाणी ६५ मिलीमीटरची अट शिथिल करुन मदत करण्याचा निर्णय करण्यात येणे,

शेतकरी पुन्हा आपल्या पायावर उभा असला पहिजे आणि भविष्यात शेती समृध्द झाली पाहिजे या हेतूने राज्याचे मा. मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच अनेक मंत्र्यांनी शेतक-यांच्या बांधावर जाऊन व नुकसानाबाबत त्यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करुन त्यांना तातडीने मदत देण्याची यंत्रणा उभारली असणे, बिबटे, वाघ अशा हिंस्त्र व वन्य प्रण्यांचे हल्ले वाढले असल्याने शेतक-यांना मृत्यूस सामोरे जावे लागणे, या प्राण्यांमुळे शेतपिकांचे होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने शेताला कुंपन घालण्यासाठी शेतक-यांना अनुदान देण्याची आवश्यकता, पाणंद रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पाणंद रस्ते योजना" अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची आवश्यकता, सर्प दंशाचे प्रमाण ग्रमीण भागात वाढले असल्याने मृत झालेल्या व्यक्तींना गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना लागू करण्याची व त्यामध्ये मृत व्यक्तींच्या कुटुंबियाला २ लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्याची आवश्यकता, विदर्भ, मराठवाडयासह उर्वरित महाराष्ट्रातील मागासभागाचा अनुशेष दूर करण्यासाठी शासनाने उचललेली ठोस पाऊले, विदर्भ, मराठवाडयाशी संबंधित वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प पूर्ण करुन बळीराजाला सिंचनासाठी मुबलक पाणी पुरवठा करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, अमरावती येथे मेघा टेक्सटाईल पार्कची केलेली निर्मिती, विदर्भात रोजगार उपलब्ध करण्याच्या दृष्टीने अतिदुर्गम गडचिरोली जिल्हयात उभारण्यात येत असलेले उद्योग, "मराठवाडा वॉटर ग्रीन" हा महत्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी महायुती सरकारने घेतलेला निर्णय, गडचिरोली नवीन रेल्वे मार्ग, नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प इत्यादी कामांना गती देण्यात येणे, विदर्भांसाठी ३५ हजार कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांना मान्यता देण्यात येणे, राज्यात नैसर्गिक शेतीला प्रेत्साहन देण्यात येणे, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना आणि दुष्काळी भागासाठी असलेल्या बळीराजा जलसंजीवनी या केंद्र अर्थसहाय्य योजनांबरोबर राज्यातील रखडलेल्या सिंचन प्रकल्पांना गती देण्यात येणे, महावितरणच्या माध्यमातून शेतक-यांना १ लाख सौर कृषी पंपाचे वाटप करण्यात येणे, मुबलक विजेसाठी सौर ऊर्जा प्रकल्पांना गती देण्यात येणे, या नैसर्गिक आपत्तीमध्ये दुर्देवाने मृत्यू झालेल्या व जखमी झालेल्या शेतक-यांनाही शासनाकडून मदत देण्यात येणे, कुक्कुटपालनाला १०० रुपये प्रती कोंबडी मदत देण्यात येणे, पीक विमा उतरविलेल्या शेतक-यांना विम्याद्वारे प्रती हेक्टर रुपये १७ हजार मदत देण्यात येणे, बियाणे व इतर कामांसाठी प्रतिहेक्टर रुपये १० हजार सर्वसाधारण मदत देण्यात येणे इ. मार्गाने आपत्तीग्रस्त बाधित कुटुंबांना सर्वकष मदत देऊन शेतक-यांप्रती असलेले उत्तरदायित्व जपण्याचा प्रयत्न करणे, अशा रीतीने प्रभावी मदत कार्यातून आपत्तीग्रस्तांना दिलासा देण्यात हे शासन जागृत असणे, विदर्भ-मराठवाडयासह संपूर्ण राज्याचा विकास व राज्यातील शेतकरी समृध्द होण्याबाबत राज्यातील आपदग्रस्त शेतकरी स्वतःच्या पायावर उभा रहावा याकरिता करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**दहा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

**(१) श्रीमती उमा खापरे, सर्वश्री. प्रविण दरेकर, प्रसाद लाड, वि.प.स.**

" राज्यातील दुर्गम भागातील मेळघाटात गेल्या पाच महिन्यांमध्ये शून्य ते सहा महिने वयोगटातील ६५ बालकांचा कुपोषणामुळे मृत्यू झाल्याची दखल मा. उच्च न्यायालयाने घेऊन शासनावर ताशेरे ओढले असणे, मेळघाट आणि अन्य आदिवासी

भागातील मुलांचा कुपोषणामुळे मृत्यू ओढावत आहे तसेच येथील नागरिकांना इतरही समस्या भेडसावत असल्याने मा. उच्च न्यायालयात जनहित याचिकेच्या माध्यमातून सुनावणी घेण्यात आली असून सार्वजनिक आरोग्य, आदिवासी विकास, महिला आणि बालविकास व वित्त या चार विभागाच्या प्रधान सचिवांना उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आलेले असणे, त्यामुळे कुपोषणाने होत असलेले बालमृत्यू रोखण्याकरिता उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन यापुढे कुपोषणामुळे बालमृत्यू होणार नाहीत याची दखल घेण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

(२) **सर्वश्री. शशिकांत शिंदे, एकनाथराव खडसे, अरुण लाड, वि.प.स.**

"मिरा-भाईंदर महानगरपालिकेमध्ये दिनांक ५ जानेवारी, २०२४ पासून कार्यरत सुरक्षा रक्षकांना माहे जानेवारी, २०२४ ते मे, २०२४ पर्यंत शासन निर्णयानुसार वेतन प्राप्त होणे, परंतु, महानगरपालिका आयुक्त यांनी आस्थापना विभागास सुरक्षा रक्षकांना २८ हजार प्रमाणे वेतन देण्याचे आदेश दिल्यामुळे माहे जून, २०२४ पासून ते आजपर्यंत रुपये २८ हजार प्रमाणे वेतन अदा करण्यात येत असणे, महानगरपालिकेकडून शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे सुरक्षा रक्षक मंडळ, ठाणे विभाग यास वेतन अदा करण्यात येत नसल्यामुळे महानगरपालिकेकडून मंडळास अदा करण्यात येणाऱ्या वेतनात कपात होणे, सुरक्षा रक्षक मंडळाकडे कमी वेतन गेल्यामुळे सुरक्षा रक्षक मंडळाकडून सुरक्षा रक्षकांना प्रति महिना पूर्ण वेतन अदा न होणे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेंतर्गत कार्यरत सुरक्षा रक्षक यांना नियमित वेतन मिळत नसल्यामुळे मंडळाचे अध्यक्ष यांच्याकडे तक्रार केली असता अध्यक्षांनी मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तथा अतिरिक्त आयुक्त यांना शासन निर्णयाप्रमाणे वेतन काढण्यास वारंवार पत्रव्यवहार केला असणे, तरी देखील महानगरपालिका आयुक्त तथा अतिरिक्त आयुक्त यांनी शासन निर्णयाप्रमाणे वेतन न देणे, राज्यात अन्य महानगरपालिकेंतर्गतच्या आस्थापना विभागांमध्ये कार्यरत सुरक्षा रक्षक मंडळ यास शासनाने नियमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे वेतन अदा करण्यात येत असून, केवळ मिरा-भाईंदर महानगरपालिकेमध्येच कमी वेतन अदा करण्यात येत असणे, त्यामुळे सुरक्षा रक्षक मंडळाकडून मिळणारे फायदे सुरक्षा रक्षकांस मिळत नसणे, परिणामी प्रति महिना पूर्ण वेतन न मिळाल्याने सुरक्षा रक्षकांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असून, मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील सुरक्षा रक्षकांना शासनाने नियमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे वेतन अदा करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही."

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : ०९ डिसेंबर, २०२५

**डॉ.विलास आठवले**
सचिव - ३ ,
महाराष्ट्र विधानपरिषद